Jan 17 2015 : MaharashtraTimes (Ahmednagar)

# खुल्या बाजारातून निधी उभारावा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची महावितरणला सूचना

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

जागोजागी जॅम होणाऱ्या मुंबईतील वाहतुकीची कोंडी फोडणे हाच शहराच्या विकासातील कळीचा मुद्दा आहे. एलिव्हेटेड लोकल ट्रेन, भूमिगत मेट्रो अशा महत्त्वाच्या पायाभूत सुविधांना राज्य सरकारने मंजुरी दिली असून, पुढील दोन-तीन महिन्यांत कोस्टल रोड प्रकल्पही मार्गी लावला जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केली. त्याचप्रमाणे 'महावितरण'ने खुल्या बाजारातून निधी उभा करावा अशी सूचनाही त्यांनी केली.

'महाराष्ट्र औद्योगिक आणि



आर्थिक विकास असोसिएशन'ने आयोजित केलेल्या एकदिवसीय 'महाराष्ट्र इकॉनॉमिक समिट'मध्ये फडणवीस यांनी मुंबईकरांचा प्रवास सुखदायी करण्याचे आश्वासन दिले. शहरांच्या विकासाबाबत केंद्रातील मोदी सरकारचा दृष्टिकोन अत्यंत सकारात्मक आहे. कोस्टल रोड प्रकल्प सुरू करण्यासाठी फक्त पर्यावरण खात्याची परवानगी मिळणे बाकी आहे. आता त्यात दिरंगाई होणार नाही, असे फडणवीस म्हणाले.

राज्यातील सरकारी वीजपुरवठा कंपनी, 'महावितरण' कर्ज आणि थकबाकीच्या ओझ्याखाली असून, तिला अर्थसाह्य करण्यासाठी राज्य सरकारला थेट मदत करावी लागते, वा कर्जासाठी हमी द्यावी लागते. पण, ही पद्धत कायम ठेवता येणार नाही. 'महावितरण'ला खुल्या बाजारात रोखे वा समभाग विक्रीतून (इक्विटी) निधी उभा करावा लागेल, असा पर्याय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी महाराष्ट्र इकॉनॉमिक समिट'मध्ये सुचवला.

>> सविस्तर वृत्त ...९